राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक - रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.३/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक
मादाम कामा रोड, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक - २४ जानेवारी, २०१२.

## प रि प त्र क

आचारसंहितेच्या कालावधीत प्रजासत्ताक दिन येत असल्यामुळे संबंधित जिल्ह्याच्या पालक मंत्र्यांना ध्वजारोहण करता येईल का, याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे विचारणा होत असल्याने राज्य निवडणूक आयोगाच्या समक्रमांकाच्या दिनांक- ११/१/२०१२ च्या परिपत्रकान्वये खुलासा करण्यात आलेला आहे. तथापि, त्यामध्ये संबंधित जिल्ह्याच्या पालक मंत्र्यांनी त्यांच्या जिल्ह्यामध्ये ध्वजारोहण करावे किंवा कसे याबाबत स्पष्ट उल्लेख नसल्याने याबाबत अधिक स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे असे स्पष्ट करण्यात येते की आचारसंहिता कालावधीमध्ये प्रजासत्ताक दिन येत असल्यास जिल्ह्याच्या पालक मंत्र्यांना ध्वजारोहण करता येईल. मात्र कार्यक्रमाच्या नेहमीच्या स्थळामध्ये बदल करण्यात येऊ नये. तसेच समारंभात करावयाची भाषणे बलिदान केलेल्या हुतात्म्यांचा तसेच देशाचा गौरव यापुरती मर्यादित ठेवण्यात यावीत. कोणत्याही परिस्थितीत निवडणूक प्रचाराची भाषणे करण्यात येणार नाहीत व आचारसंहितेचा भंग होणार नाही याची खबरदारी जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावी.

नीला सत्यनारायण
( नीला सत्यनारायण )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक - रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.३/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक - ११ जानेवारी, २०१२.

**परिपत्रक**

आचारसंहितेच्या कालावधीत प्रजासत्ताक दिन येत असल्यामुळे संबंधित जिल्हयाच्या पालक मंत्र्यांना ध्वजारोहण करता येईल का, याबद्दल राज्य निवडणूक आयोगाकडे विचारणा होत आहे. याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की आचारसंहितेच्या कलम १४ नुसार अश्या कार्यक्रमांना लोकप्रतिनिधींची उपस्थिती असण्यास हरकत नाही. मात्र कार्यक्रमाच्या नेहमीच्या स्थळामध्ये बदल करण्यात येऊ नये. तसेच समारंभात करावयाची भाषणे बलिदान केलेल्या हुतात्म्यांचा तसेच देशाचा गौरव यापुरती मर्यादित ठेवण्यात यावीत. कोणत्याही परिस्थितीत निवडणूक प्रचाराची भाषणे करण्यात येणार नाहीत व आचारसंहितेचा भंग होणार नाही याची खबरदारी जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावी.

नीला सत्यनारायण
( नीला सत्यनारायण ) ११/१/१२
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी

D:\Code of Conduct Reference\sab-MC- Relevance.doc/sab